## संक्षिप्त वृत्त...

### पसारे वस्तीजवळ अपघात; चालकावर गुन्हा दाखल

**सोलापूर** : तुळजापूर रोड येथील पसारे वस्तीजवळ दुचाकीच्या अपघातात दोघेजण जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी दुचाकि (एमएच.१३.ईडी.६४०९) यावरील चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी नागनाथ धोंडप्पा कोप्पा (वय-५०, सन्मित्रनगर,शेळगी) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी व त्यांचा मित्र प्रमोद भुतळा असे दोघे मिळून हगलूर येथील सिमेंट कारखाना येथे दसऱ्याचे सोने देऊन घरी येत असताना पाठीमागून दुचाकी चालकाने त्यांना मागून धडक दिल्याने हा अपघात घडला. तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल जगताप करीत आहेत.

### कचरा टाकून येत असताना अपघात

**सोलापूर** : झाडलेला कचरा रस्त्याच्या कडेला टाकून येत (एमएच.१३-डीजे.४५००) या क्रमांकाच्या अज्ञात वाहन चालकाने फिर्यादी कविता नितीन जानराव (वय-३५, मिलिंदनगर) यांना धडक देऊन जखमी केले. अशा आशयाची फिर्याद कविता जानराव यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात मोटरसायकल चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल वाडीकर करीत आहेत. ही घटना पत्रकार भवन येथे घडली.

### कंटेनरच्या धडकेत पाच मेंढ्या मृत्युमुखी

**सोलापूर** : कंटेनरच्या धडकेत पाच मेंढ्यांचा मृत्यू झाल्याची घटना विश्वंभर लकडे यांच्या शेता समोरील हायवेवर घडली. याप्रकरणी जीवन सोमनिंग सेनेवाडीकर (वय-३४,रा.हत्तूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून खालीद शहाबुद्दीन पठाण (वय-४६, हरियाणा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. फिर्यादी हे वरील ठिकाणी रस्ता ओलांडून पलीकडे जात असताना खालीद पठाण यांच्या ताब्यातील कंटेनर (आर. जे.१४.जीएच.७७४०) हा फिर्यादी यांच्या ताब्यातील मेंढ्यांना धडक देऊन पाच मेंढ्याच्या मयतास व पाच मेंढ्या जखमी होण्यास कारणीभूत ठरला. तपास पोसई दाईंगडे हे करीत आहेत.

### चोरट्याने घरासमोर लावलेली दुचाकी पळवली

**सोलापूर** : घरासमोर पार्क करून ठेवलेली (एमएच.१३. सीएफ.५१४९) या क्रमांकाची दुचारी चोरट्याने डुप्लिकेट चावीचा वापर करून हँडल लॉक तोडून चोरून नेली. ही घटना राहुल गांधी झोपडपट्टी येथे घडली. याप्रकरणी अझरुद्दीन अ.कादर भागनगरी (वय-२९, राहुल गांधी झोपडपट्टी) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक गंगावणे हे करीत आहेत.

### चोरट्याने बारा बोर बंदुकीच्या काडतुसे चोरल्या

**सोलापूर** : अज्ञात चोरट्याने बंद घराच्या दरवाजाचे कडी- कोंयडा तोडून घरातील तिजोरीत ठेवलेली १२ बोअर बंदुकीची १२ काडतुसे चोरून नेली. ही खळबळजनक घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील दहिटणे गावात घडली.याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. दहिटणे- शेळगी रस्त्यावर स्वराजसिंग रघुवीरसिंग गौर यांची शेतजमीन, राहतं घर आहे. कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्या बंद घराचे दरवाजा व लोखंडी ग्रीलचे दरवाजाचे कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. घरातील लोखंडी तिजोरीचे लॉकर उचकटून लॉकरमधील बारा बोअर बंदुकीच्या १२ काडतुसांची (बुलेट्स) चोरी केली. घरात चोरी झाल्याचा प्रकार दिसून आल्यावर स्वराजसिंग रघुवीरसिंग गौर यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.चोरीस गेलेली काडतूस असे सुमारे तीस ते पस्तीस वर्षांपूर्वीची होती, असं सांगण्यात आलं. त्याची सरकारी किंमत ४८० रुपये आहे. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पवार हे करीत आहेत.

### मागील भांडणाचा राग मनात धरून मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर** : जी.एम. चौकात झालेल्या भांडणाचा राग मनात धरून फिर्यादी अनिकेत उलजन दुपारघोडे (वय-२४,हनुमाननगर) हे सम्राट चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान समोर थांबले असता त्यांना रितेश सचिन गायकवाड, सुधीर जयभीम गायकवाड, वर्षा सचिन गायकवाड, कल्पना जयभीम गायकवाड (मिलिंदनगर, बुधवार पेठ) यांनी शिवीगाळ करत हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली अशा आशयाची फिर्याद अनिकेत दुपारघोडे यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली. त्यांच्या फिर्यादीवरून वरील चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जमादार करीत आहेत.

### मळेगाव येथे पत्नीचे हात फ्रॅक्चर केले; पतीविरुद्ध गुन्हा

**पांगरी** : शेतातील कामाच्या कारणावरून काठीने बेदम मारहाण करून पत्नीला गंभीर जखमी करण्यात आले. ही घटना मळेगाव (ता.बार्शी) येथे २५ ऑक्टोबर रोजी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात पांगरीच्या पोलिसांनी जखमीच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला. रोहिणी विठ्ठल गुगळे (वय ३५ रा. मळेगाव ता.बार्शी) असे जखमी झालेल्या विवाहितेचे नाव आहे. त्यांना मारहाण केल्याप्रकरणी त्यांचा पती विठ्ठल भागवत गुगळे याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. रोहिणी गुगळे या घरात काम करीत होत्या. त्यांच्या पती विठ्ठल हा दारू पिऊन घरी आला. आणि शेतातील कामाच्या कारणावरून त्यांना जाळ काठीने मारहाण केली. त्यात त्यांचा डावा हात फ्रॅक्चर झाला. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार शेख पुढील तपास करीत आहेत.

## ● निधन वृत्त....



### महादेव भास्कर

**अक्कलकोट** : येथील मंगरुळे प्रशालेचे सेवानिवृत्त शिक्षक महादेव बाबुराव भास्कर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### प्रगती कांबळे



**सोलापूर** : सोनियानगर, जुना विजापूर नाका येथील रहिवासी प्रगती भालचंद्र कांबळे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ४२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे.

# दंड, व्याज टाळण्यासाठी व्यापाऱ्यांनी करावी जीएसटीची तांत्रिक पूर्तता

## जीएसटी तज्ज्ञ आदित्य सुरते यांचे प्रतिपादन

**सुराज्य/सोलापूर**

जीएसटीची नोटीस आल्यानंतर दंड व्याज टाळण्यासाठी व्यापाऱ्यांनी जीएसटी संबंधित तांत्रिक बाबींची पूर्तता करावी, असे प्रतिपादन जीएसटी तज्ज्ञ आदित्य सुरते यांनी केले.

इन्कम टॅक्स अँड सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन आणि गुड्स अँड सर्व्हिस टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने गुजराती भवन येथे 'जीएसटी व इन्कम टॅक्स' या विषयावर आयोजित जिल्हास्तरीय कार्यशाळेत सुरते बोलत होते.



याचे उद्घाटन क्रेडाईचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुनील फुरडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाले. याप्रसंगी गुड्स अँड सर्व्हिस टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रवीण शिंदे, इन्कम टॅक्स अँड सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. विनायक नगरकर, उपाध्यक्ष किसन बिल्ला, सचिव विकास कोडमूर, विनोद मस्के उपस्थित होते.याप्रसंगी सहसचिव ॲड. सागर अरकाल, एम.पी. कोरुलकर, ए.जे.शाह, व्ही. एस. कोनापुरे, एम. के. पाटील, एस. एस. कोणशिरसगी, आर. एम. हिरेमठ, इद्रिस बागवान, एस. एस. लोणी, के. के. नागर, ए. डी. अंदोरे, व्ही. जी. पाटील, यू. एन. सामलेटी, बी. एस. श्रीचिप्पा, यू. एस. देसाई, एम. ए. दुरुगकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक विनायक नगरकर यांनी, आभारप्रदर्शन ॲड. विकास कोडमूर यांनी केले.

# रामजी कश्यपची राज्य खो-खो संघाच्या कर्णधारपदी निवड

**सुराज्य/वेळापूर**

गोवा येथे होणाऱ्या नॅशनल गेम खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य संघाच्या कर्णधारपदी वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर खो-खो क्लबचा खेळाडू व इंग्लिश स्कूल वेळापूरचा माजी विद्यार्थी, सुवर्णपदक विजेता रामजी कश्यप याची निवड झाली आहे.




रामजी कश्यपला खो-खोचे राष्ट्रीय प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, अध्यक्ष जावेद मुलाणी, प्रशिक्षक सतीश कदम, शिवाजी जाधव, जावेद अत्तार, श्रीनाथ खटके, अजित बनकर, वैभव बनसोडे, धनंजय शिवपुजे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे उत्तमराव जानकर, रजनीश बनसोडे, नानासाहेब मुंगुसकर, बाळासाहेब धाईंजे, प्रा. धनंजय साठे, शहाजी मंडले, मिलिंद सरतापे, संजय देशपांडे, संजयआबा मंडले, शिवाजी मंडले, जावेद अत्तार, ॲड. सुजित कदम, प्रियदर्शनी महाडिक-कदम, डॉ. सुभाष कदम, डॉ. मीना कदम, तेजस्विनी कदम, प्रतापराव पाटील, प्राचार्य आर. बी. पवार, सुनील खंदारे, पठाण शिवशरण, स्मिता पिसे, दत्तात्रय काटे, सत्यवान पिसे आदींनी अभिनंदन केले आहे.

# दोड्डी ग्रामपंचायत निवडणुकीत चौगुले यांना राठोड यांचा पाठिंबा

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

दोड्डी येथील ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सरपंच पदाचे उमेदवार तारासिंग खेमू राठोड यांनी सदाशिव ज्ञानेश्वर चौगुले या सरपंच पदाच्या उमेदवारास बिनशर्त पाठिंबा दिला आहे.



दोड्डी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी ताराचंद राठोड यांनी सदाशिव चौगुले यांना पाठिंबा दर्शविला आहे. त्याप्रसंगीचे छायाचित्र.

याप्रसंगी पॅनल प्रमुख ॲड. शिवाजी राठोड, मार्केट कमिटी संचालक दगडू जाधव, शंकर राठोड, वसंत राठोड, उमाकांत राठोड, उमाकांत राठोड, तारासिंग राठोड, हिरा जाधव, धीरशिंग चव्हाण, सचिन राठोड, निलेश जाधव, अनिल राठोड, रामराव जाधव, विठ्ठल राठोड, रतन जाधव, रेखू राठोड, राहूल चव्हाण, गणेश चव्हाण, प्रदीप राठोड, संतोष जाधव, भानुदास पवार, सुरेश पवार, महादेव राठोड, राजू राठोड उपस्थित होते.

# जयसिद्धेश्वर स्वामीजींच्या हस्ते भक्तांना सफरचंद फळांचे वाटप

**सुराज्य/सोलापूर**

तळे हिप्परगा येथील श्री गणेश हायवे पेट्रोल पंप यांच्यावतीने तुळजापूरला पायी जाणाऱ्या देवी भक्तांना खा. डॉ. जय सिद्धेश्वर महास्वामीजी यांच्या हस्ते सफरचंद फळांचे वाटप केले.

यावेळी पो.नि. सुरेश निंबाळकर, प्रोप्रायटर राजू हौशेट्टी, गौडगाव मारुती मंदिराचे पुजारी खानापुरे, बाळासाहेब वाघमारे, आनंद चंदनशिवे, राजू हत्ती, गणेश पुजारी, चंद्रकांत रमणशेट्टी, बापू शिंदे उपस्थित होते. यासाठी गणेश हौशेट्टी, कुमार सुरवसे, सुमीत नन्नवरे,स्वप्निल वायचळे, गणेश गुदगे, समीर सय्यद, ज्ञानेश्वर शिंदे, समर्थ बमगुंडे, ओम खराडे, देवा यादव, सत्तार मुल्ला आदींनी परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन नागराज हौशेट्टी यांनी केले.





सोलापूर : श्री गणेश हायवे पेट्रोल पंप यांच्यावतीने भक्तांना सफरचंद फळाचे वाटप करताना खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी,सुरेश निंबाळकर, राजू हौशेट्टी, बाळासाहेब वाघमारे, आनंद चंदनशिवे आदी.

# वैचारिक भूमिका घेऊन पत्रकारिता करण्याची गरज : शिंदे

## पत्रकारांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीचे वाटप



सोलापूरः श्रमिक पत्रकार संघातर्फे पत्रकारांच्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी सुशीलकुमार शिंदे यांच्यासह पत्रकार बांधव, पाल्य दिसत आहेत.

**सुराज्य/सोलापूर**

स्वातंत्र्यपूर्व काळापासून सोलापूरला वैचारिक भूमिका मांडणाऱ्या पत्रकारांचा समृद्ध वारसा लाभला आहे. आजही वैचारिक भूमिका घेऊन समाज जीवन सुधारणारी पत्रकारिता करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने पत्रकारांच्या पाल्यांना पत्रमहर्षी स्व.रंगाअण्णा वैद्य आणि ज्येष्ठ संपादक स्व.बाबूराव जक्कल यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. यावेळी शिंदे बोलत होते. याप्रसंगी अभय दिवाणजी, नितीन फलटणकर, प्रशांत माने, संजय पाठक या संपादकांचा पदोन्नतीबद्दल सत्कार करण्यात आला. प्रारंभी स्वागत खजिनदार विनोद कामतकर यांनी केले. प्रास्ताविक श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी केले. याप्रसंगी फलटणकर, दिवाणजी, पाठक, माने यांनी मनोगत व्यक्त केले. माजी अध्यक्ष दशरथ वडतिले, मनोज व्हटकर, तात्यासाहेब पवार, श्रीकांत कांबळे आदींसह पत्रकार व त्यांचे पाल्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन विजयकुमार राजापुरे, आभार प्रदर्शन सरचिटणीस सागर सुरवसे यांनी केले.

### ...बोरामणी विमानतळ सुरू होणारच : शिंदे

होटगी रोड विमानतळाची जागाअपुरी पडत असल्याने बोरामणी आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी जागा घेतली. पैसेही दिले. परंतु तिथे अचानक माळढोक आढळल्याचे सांगण्यात येते. परंतु माळढोक कुठे आहे ? तो दिसत नाही. राजकारणासाठी अशा गोष्टी घातक आहेत. विकास झाला पाहिजे. ज्यांनी अडचणी निर्माण केल्या, त्यांना त्या लखलाभ असो. सध्या किमान सोलापूर विमानतळ तरी चालू करावे. एक सुशीलकुमार गेला तरी दुसरा सुशीलकुमार येईल. आज ना उद्या बोरामणी विमानतळ सुरू होईल, असा विश्वासही शिंदे यांनी व्यक्त केला.

# विनाअनुदानित ४४ खेळांच्या स्पर्धा डिसेंबरमध्ये

**सुराज्य/सोलापूर**

संघटनेच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विनाअनुदानित ४४ खेळांच्या स्पर्धा दि. १ डिसेंबरपासून सुरु होणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी माहिती दिली. कुमठा नाका येथील क्रीडा कार्यालयात आयोजित क्रीडा संघटनाच्या बैठकीत ही माहिती दिली. क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या मार्फत या स्पर्धा होणार आहेत.

याप्रसंगी जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी उरलेल्या ४४ खेळा संदर्भात मार्गदर्शन केले. पवार म्हणाले, या स्पर्धा दि. १ ते १० डिसेंबरदरम्यान घेण्यात येतील. प्रत्येक संघटनेने तालुक्यात विनाअनुदानित खेळाचे प्रशिक्षण घेतले पाहिजे. त्या खेळांचा प्रचार व प्रसार केला पाहिजे. ज्या संघटनेने विभागीय किंवा राज्यस्तरीय स्पर्धा घेणार आहेत, त्या संघटनेच्या अध्यक्षांनी जिल्हा क्रीडा कार्यालयाकडे पत्र देऊन मागणी करावी. या विना अनुदानित खेळांचे प्राथमिक प्रवेशिका दि. २५ नोव्हेंबरपर्यंत चालू राहील. या स्पर्धेत जे खेळाडू प्राविण्य प्राप्त करतील, अशा खेळाडूंना ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात येईल. दि.३० ऑक्टोंबरपर्यंत संघटनेचे नोंदणी प्रमाणपत्र व आपल्या संघटनेचे पत्र क्रीडा कार्यालयात आणून द्यावेत.

यावेळी तालुका क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, गणेश पवार, सुप्रिया गाढवे, मनोज बाळगे, विठ्ठल कुंभार, प्रा.संतोष खेडे, सुहास छंचुरे, संभाजी मस्के, इक्बाल शेख धनंजय धैंडे, प्रा. कल्याणप्पा हायगोंडे, रविंद्र चव्हाण आदी उपस्थित होते.

# उद्या माळशिरसमध्ये रिपाइंची बैठक

**सुराज्य/वेळापूर**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका कार्यकारिणीची आढावा बैठक सोमवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी दुपारी १२:३० वा माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीत जानेवारी-२०२३ ते डिसेंबर-२०२३ रोजी मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीबाबत चर्चा करणे, माळशिरस तालुक्यातील जनतेच्या जीवनाशी निगडित समस्या, आदी विषयांवरती आंदोलनाची तारीख ठरविणे. रिपब्लिकन आपल्या दारी, गाव भेट दौरा अभियानातून गाव तेथे शाखा निर्माण करणे. रिपब्लिकन पक्षाचे क्रियाशील सभासद वाढविणे. प्रमुख पदाधिकारी यांच्या गावामध्ये प्रथम शाखा उद्घाटन करणे. आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे आदी विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे.

या बैठकीस राज्य पदाधिकारी, पश्चिम महाराष्ट्र पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तरी माळशिरस तालुक्यातील तालुका पदाधिकारी युवक आघाडी तालुका पदाधिकारी शहर पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे.

या बैठकीस वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, तालुका कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे यांनी केले आहे.

# मंगळवेढेकरांचा हिस्सा पूर्ण क्षमतेने द्या

## म्हैसाळ उपसा सिंचन पाणी नियोजनाची बैठक; आमदार समाधान आवताडे यांची मागणी

**सुराज्य/लक्ष्मीदहिवडी**

म्हैसाळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत मंगळवेढा तालुक्यातील रेवेवाडी, हुन्नूर, लोणार, महमदाबाद, पडोळकरवाडी, शिरनांदगी, मारोळी, चिक्कलगी, जंगलगी, सलगर बु, सलगर खु, बावची, पौट, आसबेवाडी, लवंगी, शिवणगी, येळगी, सोड्डी, हुलजंती या १९ गावांना १२७० एमसीएफटी एवढे पाणी मंजूर असताना केवळ ८० एमसीएफटी म्हणजेच फक्त ६ टक्के पाणी या गावांना आजपर्यंत देण्यात आले आहे. या योजनेतील पूर्ण पाण्याची मागणी केली असता केवळ वेळोवेळी विविध तांत्रिक कारणांचा आधार घेऊन पाणीवाटपाचा हा कोणता न्याय करण्यात येत आहे ? असा खडा सवाल आ आवताडे यांनी कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाअंतर्गत म्हैसाळ उपसा सिंचन कालवा सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये उपस्थित केला.



लक्ष्मी दहिवडीः सांगली येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहातील जिल्हाधिकारी कार्यालयात म्हैसाळ उपसा सिंचन पाणी नियोजनासंदर्भात आयोजित बैठकीत आ. समाधान आवताडे यांनी मंगळवेढा तालुक्याला पाणी देताना दुजाभाव होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. त्याप्रसंगी उपस्थित मान्यवर.

कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाअंतर्गत म्हैसाळ उपसा सिंचन कालवा सल्लागार समितीची बैठक व सन २०२३-२४ मधील रब्बी व उन्हाळी हंगामातील म्हैसाळ उपसा सिंचन पाणी नियोजन संदर्भात राज्याचे कामगारमंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री सुरेश खाडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली येथे पार पडली.

यावेळी आ. समाधान आवताडे यांनी मंगळवेढा तालुक्याला पाणी देताना दुजाभाव होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले.

यावेळी खा.संजयकाका पाटील, आ.शहाजीबापू पाटील, आ.विक्रम सावंत आ.गोपीचंद पडळकर, आ.अरुण लाड, आ सुमन पाटील, माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जलसंपदा विभाग कार्यकारी अभियंता रो. रा. कोरे उपस्थित होते.